# आंदोलनामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई कोण देणार?- हायकोर्ट

**मुंबई–** सोमवारी (१ सप्टेंबर) झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने २४ तासांच्या आत मराठा आंदोलकांना मुंबई सोडण्याचे आदेश देण्यात आले. राज्य सरकारने जरांगे यांच्या मागण्या मान्य केल्यानंतर लाखो मराठा आंदोलकांनी रात्रीपर्यंत मुंबई सोडली. पण काल झालेल्या सुनावणीत न्यायालयाने पुन्हा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना फटकारले आहे.

मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासाठी करण्यात आलेल्या आंदोलनामुळे मुंबईतील सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले. मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना चार आठवड्यांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच आंदोलनादरम्यान सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई कोणाक़ या नुकसानीची भरपाई कोणाकडून करायची, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला आहे. उच्च न्यायालयातील प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर याचिकेची सुनावणी झाली.

**हायकोर्टात नेमके काय घडले?**

मनोज जरांगे यांनी अनेकदा प्रक्षोभक भाषणे दिली. त्यामुळे मोठ्या संख्येने मुंबईतील सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले. पण जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी हे आरोप फेटाळून लावले. मनोज जरांगेंनी कोणतेही प्रक्षोभक भाषण दिले नाही. आंदोलकांनीदेखील रस्ते किंवा फूटपाथ अडवण्याशिवाय दुसरे कोणतेही नुकसान केले नाही. असा दावा केला. पण त्याचवेळी न्यायालयाने काही फोटो दाखवत नुकसान झाल्याचे दाखवले.

आंदोलकांमधील समन्वयाचा अभाव किंवा इतर कोणत्याही कारणामुळे हे सगळे घडले असावे, असे आंदोलकांकडून सांगण्यात आले. पण नुकसान तर झाले आहे, असा पुनरूच्चार न्यायालयाने केला. पण आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नाही. असं सांगण्याचा जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी पुन्हा प्रयत्न केला.

# अस्तगावला गौरी पूजन सोहळा दक्षिण भारतीय थाटात

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** येथील अरुण माधवराव बोऱ्हाडे व साधना अरुण बोऱ्हाडे यांच्या घरी गौरी पूजनाचा सण दक्षिण भारतीय थाटात उत्साहाने साजरा करण्यात आला. गेले २८ वर्षे कुटुंबातील सदस्य श्री. स्वप्निल, सौ स्वरा, सिद्धी व श्री यांनी हा वारसा जपला आहे.

गौरी पूजनाचे विशेष आकर्षण ठरले दक्षिण भारतीय थीमवरील सजावट. केळीचे पान, रांगोळ्या, तोरणं आणि पारंपरिक दीपांच्या प्रकाशाने परिसर उजळून गेला. संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि आनंदमय झाले होते. याप्रसंगी श्री. बिडवे, सुनील शहाणे बेलापूरकर, अर्चना बोराडे, संजय बागुल उपस्थित होते. बोऱ्हाडे कुटुंबियांनी सांगितले,



गौरी पूजन हा फक्त धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक परंपरा जोडणारा उत्सव आहे. हा उत्सव साजरा करताना भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गौरी पूजनासाठी सजावट दक्षिण भारतीय सजावटीची असल्याने भेट देणाऱ्यांना यामुळे आनंद मिळाला, असे साधना बोऱ्हाडे यांनी सांगितले.

# टोकाची टीका करणाऱ्या जरांगेंसाठी सीएम फडणवीसांचा मदतीचा हात

## परतीच्या प्रवासासाठी पाठवली खास ॲम्बुलन्स

**मुंबई–** मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला मोठं यश मिळालं आहे. सरकारने अनेक मागण्या मान्य केल्यानंतर अखेर पाचव्या दिवशी जरांगेंनी उपोषण सोडले. या आंदोलनादरम्यान त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अनेकदा सडकून टीका केली होती. मात्र, उपोषण संपल्यानंतर जरांगे यांना म्ब्युलन्सची गरज असताना, मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता ती उपलब्ध करून दिली, या भूमिकेची चर्चा आता सर्वत्र सुरु आहे.

गेले पाच दिवस मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू होते. या काळात त्यांनी सरकार आणि विशेषतः देवेंद्र फडणवीस यांच्यावर अनेकदा कठोर शब्दांत टीका केली होती. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांनी नेहमीच संयम राखला. जरांगे यांच्या तब्येतीची काळजी घेण्यापासून ते आंदोलनातील नियमांविषयी बोलण्यापर्यंत त्यांची भूमिका शांत होती.

जरांगे यांच्या उपोषणाच्या अखेरच्या टप्प्यात त्यांची तब्येत बिघडली. त्यांना तातडीने म्ब्युलन्सची गरज होती. याचवेळी देवेंद्र फडणवीस यांनी कोणताही राजकीय हेतू न ठेवता, माणूस म्हणून मदतीचा हात पुढे केला. झालं असं की उपोषण संपल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांना छत्रपती संभाजीनगरला जाण्यासाठी ॲम्बुलन्सची आवश्यकता होता. मात्र त्याचवेळी एका आंदोलनकर्त्याला छातीत दुखत असल्याने त्यालाही म्ब्युलन्सची आवश्यकता होती. मात्र एकच ॲम्बुलन्स असल्याने मराठा आंदोलनकर्त्याला प्राधान्य देत ती त्याला देण्यात आली.

त्यावेळी आझाद मैदानवरील एका व्यक्तीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून ॲम्बुलन्सची गरज असल्याचं त्यांना सांगितलं. मुख्यमंत्र्यांनीही क्षणाचाही विलंब न करता, मनोज जरांगे यांच्यासाठी ॲम्बुलन्स उपलब्ध करून दिली.

# जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या उत्तर नगर जिल्हाध्यक्षपदी आरगडे

**भोकर (वार्ताहर)–** आहिल्यानगर जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार कल्याणकारी संघ या संघटनेच्या उत्तर नगर जिल्हाध्यक्षपदी संगमनेर येथील स्वस्त धान्य दुकानदार काशिनाथ आरगडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



श्रीरामपूर तालुक्यातील भाविकांचे श्रद्धास्थान श्रीक्षेत्र गणेशखिंड येथे संपन्न झालेल्या बैठकीप्रसंगी त्यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी गणेशखिंड देवस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त बजरंग दरंदले होते. तर संघटनेचे संस्थापक जिल्हाध्यक्ष देविदास देसाई, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख चंद्रकांत झुरंगे, संगमनेरचे तालुकाध्यक्ष सुखदेव खताळ, नानासाहेब वाकचौरे, शामराव गुंजाळ, उमेश दरंदले व मच्छिंद्र भालके आदी प्रमुख उपस्थित होते. आहिल्यानगर जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार कल्याणकारी संघ ही जिल्ह्याची नोंदणीकृत संघटना आहे. ही संघटना ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकीपर्स फेडरेशन या राज्य संघटनेशी संलग्न आहे. या फेडरेशनचे प्रदेशाध्यक्ष गणपतराव डोळसे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर येथील काशिनाथ आंबु आरगडे यांची आहिल्यानगर जिल्ह्याच्या उत्तरनगर जिल्ह्यासाठी जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी श्री वरद गणेश देवस्थान ट्रस्टचे सचिव कल्याणराव लकडे, दत्तात्रय पवार, नानासाहेब पारखे व जाकीर शेख आदींसह मान्यवर उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन व आभार चंद्रकांत झुरंगे यांनी मानले.

# संजय गांधी निराधार, श्रावणबाळ आणि दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात १ हजाराची वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात एक हजार रुपयांची वाढ करण्यास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या लाभार्थ्यांना यापूर्वी दीड हजार रूपये अर्थसहाय्य दिले जात होते. आता या निर्णयाने अडीच हजार रुपये दिले जाईल.

राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत निराधार पुरुष, महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, निराधार विधवा आदींना दरमहा १ हजार ५०० रुपये अर्थसहाय्य दिले जाते. सध्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेत ४ लाख ५० हजार ७०० आणि श्रावणबाळ योजनेत २४ हजार ३ दिव्यांग लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना आता दरमहा अडीच हजार रुपये अर्थसहाय्य देण्यास आज मान्यता देण्यात आली. हे अनुदान ऑक्टोबर २०२५ पासून देण्यात येईल. यासाठी आवश्यक ५७० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

**आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील अनुसूचित जमातीतील इयत्ता नववी आणि दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी आता केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येणार आहे. या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अनुसूचित जमातीच्या नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. ही योजना आणि केंद्र सरकारच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेशी तुलना केली असता केंद्राच्या योजनेमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम राज्याच्या योजनेपेक्षा अधिक मिळते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात शासकीय वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारच्या योजनेतील लाभ दिल्यानंतरची रक्कम वगळून उर्वरित रक्कम वसतीगृह योजनेतून दिली जाणार आहे. ही योजना अनुदानित आणि शासकीय निवासी आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा तसेच नामांकित शाळा यांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

## पान १ वरुन

### जीएसटीचे आता ५ आणि...

जीएसटी देखील रद्द करण्यात आला आहे.

निर्मला सीतारमण म्हणाल्या की, दूध, रोटी, पिझ्झा ब्रेड, चेन्ना यासह अनेक अन्नपदार्थ जीएसटीमुक्त असतील. याशिवाय, सिमेंटवरील कर २८% वरून १८% पर्यंत कमी करण्यात आला आहे. याशिवाय, लक्झरी वस्तू आणि तंबाखू उत्पादनांवर ४०% जीएसटी लावण्यात येईल. ही बैठक दोन दिवसांसाठी (३-४ सप्टेंबर) होणार होती, जी एकाच दिवसात संपली आहे.

**जीएसटी कौन्सिल बैठकीचे ठळक मुद्दे**

कपडे आणि शूज स्वस्त: सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २५०० रुपयांपर्यंतच्या शूज आणि कपड्यांवरील जीएसटी दर ५% पर्यंत कमी केला जाऊ शकतो, ज्यामुळे ग्राहकांसाठी या वस्तू स्वस्त होतील.

**आरोग्य विमा आणि जीवनरक्षक औषधे स्वस्त :**

मनी कंट्रोलच्या अहवालानुसार, जीएसटी कौन्सिलने विमा प्रीमियम दर कमी करण्यास सहमती दर्शविली आहे, ज्यामुळे आरोग्य विमा खरेदी करणे स्वस्त होईल. यासोबतच, जीवनरक्षक औषधांवरील जीएसटी दर देखील कमी होण्याची अपेक्षा आहे.

लक्झरी इलेक्ट्रिक वाहनांवरील कर वाढणार : मनीकंट्रोलच्या अहवालानुसार, २० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या लक्झरी इलेक्ट्रिक वाहनांवरील जीएसटी दर ५% वरून १८% पर्यंत वाढू शकतो. जर हा प्रस्ताव मंजूर झाला तर टाटा मोटर्स, महिंद्रा, टेस्ला आणि मर्सिडीज-बेंझ सारख्या कंपन्यांसाठी ते आव्हान बनू शकते.

**१७५ वस्तूंवरील जीएसटी दरात कपात**

सुमारे १७५ वस्तूंवरील जीएसटी दरात कपात करण्यात आली आहे. यामध्ये अन्न घटक, बदाम, स्नॅक्स, तयार पदार्थ, जाम, तूप, लोणी, लोणचे, जाम, चटणी, ऑटोमोबाईल्स, ट्रॅक्टर, इलेक्ट्रॉनिक्स, एसी आणि रेफ्रिजरेटर इत्यादींचा समावेश आहे.

### ओबीसींच्या प्रश्नावर मंत्रिमंडळ...

दत्तात्रय भरणे यांचा समावेश आहे.

ओबीसी समाजाच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य सरकारच्या विविध योजनांचे परीक्षण करून उपाययोजना सुचविणे. ओबीसी वित्त आणि विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि सनियंत्रण करणे. राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये आणि पदांवर ओबीसींना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे म्हणून उपाययोजना करणे. ओबीसींच्या आरक्षणविषयक प्रशासकीय, आर्थिक स्थितीबाबत तसेच अन्य संलग्न बाबींवर विचारविनिमय करणे. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अंलबजावणीबाबत कार्यपद्धती ठरवणे. ओबीसी समाजातील आंदोलक आणि त्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करणे, अशी कार्यकक्षा उपसमितीला आखून दिली आहे.

### कामगारांच्या कामाचे तास वाढले

कारखाने अधिनियम १९४८ मध्ये विविध सुधारणा करण्यासही कालच्या मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली. राज्यात गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी हे बदल करण्यात आले आहे. कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश, त्रिपुरा यासारख्या राज्यांनी हे बदल आधीच केलेले आहेत.

या सुधारणांमुळे जास्त मागणी असलेल्या वेळेस किंवा कामगारांच्या कमतरतेमध्ये कोणत्याही व्यत्ययाशिवाय उद्योगांचे कामकाज चालू राहू शकते. कामगारांना योग्य वेतन संरक्षणासह कायदेशीररित्या अतिरिक्त उत्पन्न मिळेल. कायदेशीर अतिकालिक (ओव्हरटाईम) मर्यादा वाढवून कामगारांना मोबदल्याशिवाय अतिरिक्त काम करण्यास सांगितले जाते, यापासून संरक्षण मिळेल. आता ओव्हरटाईम न देता कामगारांकडून काम करवून घेण्याच्या प्रकाराला आळा बसेल. या बदलामुळे रोजगार निर्मितीस प्रोत्साहन, कामगार हक्कांचे संरक्षण होणार असल्याचा सरकारला विश्वास आहे. अतिकालिक कामाचा कालावधी वाढविल्यामुळे कामगारांनाही मोबदला वेतनाच्या दुप्पट दराने मिळेल.

कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ मध्ये सुधारणा केल्यामुळे कारखान्यातील दैनंदिन कामाच्या तासांची मर्यादा ९ तासांवरून १२ तासांपर्यंत होणार आहे. कलम ५५ मधील सुधारणांमुळे कारखान्यातील विश्रांतीसाठी सुट्टीचा कालावधी ५ तासानंतर ३० मिनिटे याऐवजी ६ तासापर्यंत ३० मिनिटे असा करण्यात आला आहे. याशिवाय महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तींचे विनियमन) अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही सुधारणा २० आणि त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना लागू राहील. या सुधारणांनुसार दैनंदिन कामाचे तास ९ वरुन १० करणे, त्यास अनुसरुन विश्रांतीच्या सुट्टीच्या कालावधीत बदल करणे, तातडीचे काम सोपविलेल्या कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन साडेदहा तासांवरून १२ तास करणे, अतिकालिक कामाचा कालावधी १२५ तासांवरुन १४४ तास करणे इत्यादी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

### नव्या जीआरवरून घमासान

### शासनाच्या जीआरला आव्हान देण्याच्या...

असून, सरकारने अन्याय केल्याचा आरोप ओबीसी नेत्यांनी केला आहे. त्यामुळे या जीआरला आव्हान देण्यासाठी ओबीसी नेते न्यायालयात जाणार असून त्याबाबत सध्या चर्चाही सुरु आहे. सरकारचा हा निर्णय कायदेशीर कसोटीवर टिकणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, सरकारच्या जीआरविरोधात तीव्र भूमिका घेत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी महाराष्ट्रातील ओबीसी समाजाला आवाहन केले आहे की, ३ सप्टेंबर रोजी सर्वांनी आपल्या तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन या जीआरची होळी करून निषेध नोंदवावा. तसेच मोठ्या संख्येने एकत्र येऊन तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन सरकारच्या या निर्णयाला विरोध व्यक्त करावा, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य केल्यानंतर हाके यांनी खुला विरोध दर्शवला. हैदराबाद गॅझेट संदर्भातील जीआर प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, सरकारचा हा निर्णय ओबीसी आरक्षण संपवणारा आहे. राज्यात बोगस जातप्रमाणपत्रांची खरेदी-विक्री सुरू असून, त्याची किंमत हजारोंपासून लाखांपर्यंत आहे. हा जीआर काढण्याचा अधिकार शासनाला नाही. उपसमितीनं एकतर्फी निर्णय घेतला आहे. सरकारला केवळ झुंडीचं ऐकू येत असेल तर आम्हालाही झुंड घेऊन रस्त्यावर उतरावं लागेल. भविष्यात रस्त्यावरची लढाई अपरिहार्य आहे. येत्या निवडणुकीत बोगस प्रमाणपत्रांचा पूर येईल.

**मराठा आरक्षणामुळे भुजबळ नाराज, कॅबिनेट बैठकीला दांडी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि ओबीसी समाजाचे प्रमुख नेते छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारनं काढलेल्या जीआरवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारविरोधात भूमिका घेत भुजबळ यांनी बुधवारी होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला. मात्र, त्याआधी त्यांनी पक्षाच्या प्री-कॅबिनेट बैठकीला हजेरी लावली. ही बैठक संपताच भुजबळ सह्याद्री अतिथीगृहातून थेट बाहेर पडले आणि राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला जाणं टाळलं. याबाबत त्यांनी माध्यमांशी बोलणं टाळलं असलं तरी त्यांचा जीआरविरोध स्पष्ट असल्याचं समजत आहे.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना भुजबळ म्हणाले, सरकारने काढलेल्या जीआरमुळे आमच्या ओबीसी समाजातील कार्यकर्त्यांच्या मनात अनेक शंका निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आम्ही याचा बारकाईनं अभ्यास करत असून कायदेशीर सल्लाही घेत आहोत. कारण कोणत्याही सरकारला एखाद्या समाजाला दुसऱ्या समाजात समाविष्ट करण्याचा अधिकार नाही. जात बदलता येत नाही. त्यामुळे या जीआरविरोधात आम्ही न्यायालयात जाणार आहोत. ते पुढे म्हणाले, काही जणांच्या मते सरकारनं हरकती मागवल्या पाहिजेत होत्या. तसेच उपसमितीला असा निर्णय घेण्याचा अधिकार आहे का, याबाबतही शंका आहे. राज्य सरकारकडून असा निर्णय होईल, अशी अपेक्षा आम्हाला नव्हती.

### ओबीसी समाजाच्या आरक्षणाला...

प्रतिनिधींशी बोलताना विखे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या निर्णयात मुख्यमंत्री फडणवीस यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले.

मराठा समाजासाठी ऐतिहासिक निर्णय करताना उपसमितीच्या सदस्यांनी शिंदे समितीशी सविस्तर चर्चा केली. तसेच राज्याच्या महाधिवक्त्यांचे कायदेशीर मार्गदर्शन घेऊन निर्णय केला. यासाठी मुख्यमंत्री फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी विस्तृत चर्चा करूनच आरक्षण विषयक मसुद्याला अंतिम स्वरूप देण्यात आले, असे विखे पाटील म्हणाले. ब्रिटीश राजवटीतील जिल्ह्यामध्ये असलेल्या नोंदी हैद्राबाद गॅझेटमध्ये आहेत. छाननी करूनच दाखले देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. बाहेर राहिलेल्या मराठा समाज घटकाला प्रवाहात आणून संधी देण्याचा हा प्रयत्न आहे. यामुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणताही धोका नाही. त्यामुळे मराठा आरक्षण निर्णयाबद्दल गैरसमज नको, असेही विखे पाटील यांनी सांगितले.

### भुजबळांशी चर्चा करून...

भुजबळांची नाराजी दूर होईल. हैदराबाद गॅजेट लागू करण्याचा जीआर सरकारने काढला. त्याबद्दल सविस्तर मी, मुख्यमंत्री बोललो. जो निर्णय घेतलाय तो कायद्याच्या चौकटीत बसवून घेतलाय. नियमाला धरुन घेतला आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात प्रक्रिया अधिक सोपी, सुलभ करणं यावर तो निर्णय झालाय. जीआरमध्ये त्याचा उल्लेख आहे असं ते म्हणाले. अंमलबजावणीत कुठलीही अडचण येणार नाही. कुणबी प्रमाणपत्र मराठा समाजाला मिळतील. ओबीसी समाजाचं कुठलही नुकसान होऊ नये, ही सरकारची आधीपासून भूमिका होती असं एकनाथ शिंदे म्हणाले.

### जरांगेंनी आज बोलावली अभ्यासकांची बैठक

अशी ग्वाही मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांची समाजाला दिली आहे. दरम्यान, जीआर सरकारी दस्तऐवज आहे. त्यामुळे याचिकांचा काहीही फायदा होणार नाही. उलट पक्का जीआर येईल, असे जरांगे यांची स्पष्ट केले.

### ओबीसी-मराठा वाद व्हावा हीच...

आमदार रोहित पवारांनी आता सरकारच्या या निर्णयाबाबत आपले मत व्यक्त करत काही प्रश्न उपस्थित केले आहेत. सरकारने दोन समाजात वाद लावत राजकीय पोळी भाजली असं रोहित पवारांनी म्हटलं आहे. काल घेतलेला निर्णय सर्वमान्य होता तर हाच निर्णय लोकसभा निवडणुकीपूर्वी का घेतला नाही? दोन वर्षे मराठा आणि ओबीसी समाजात दरी निर्माण करण्यासाठी मुद्दामहून वाट पाहिली गेली का?

### तीन वर्षांचे जिल्हा शिक्षक...

आली. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शिक्षक व केंद्रप्रमुखांनी पंचायत समिती कार्यालयामध्ये स्वयंमूल्यमापन करून प्रश्नावली जमा केली. प्रत्येक तालुक्यातून आलेल्या प्रस्तावांची गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांच्यामार्फत पडताळणी होऊन ३ शिक्षक (त्यामध्ये एक शिक्षिका) व एक केंद्रप्रमुख यांचे प्रस्ताव जिल्हा कार्यालयास पाठविण्यात आले. जिल्हास्तरावरून गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण) व केंद्रप्रमुख यांच्याकडून तालुके बदलून पथक परीक्षण करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रस्ताव प्राप्त शिक्षक व केंद्रप्रमुख यांची २५ गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समितीची बैठक होऊन पथकाकडून प्राप्त १०० गुणांची प्रश्नावली व लेखी परीक्षेचे २५ गुण असे एकूण १२५ गुणांपैकी ज्यांना सर्वात जास्त गुण मिळाले अशा प्रत्येक तालुक्यातून एक शिक्षक यांचा प्रस्ताव नाशिक विभागीय आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला. त्यातून २०२४-२०२५ या वर्षासाठीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. विशेष म्हणजे २०२३ व २०२४ या दोन वर्षांचे पुरस्कार त्या-त्या वेळी जाहीर झाले. परंतु त्याचे वितरण झालेले नव्हते. त्यामुळे आता तीनही वर्षांचे एकत्रित पुरस्कार वितरण शुक्रवारी होत आहे.

**यांची प्रमुख उपस्थिती**

कल्याण रस्त्यावरील व्दारका लॉन येथे शुक्रवारी सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होत असून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे असतील. दोन्ही खासदार व सर्व आमदारांसह जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, सीईओ आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण होणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, संध्या गायकवाड (माध्यमिक) व बाळासाहेब बुगे (योजना) यांनी दिली.

**पुरस्कार प्राप्त शिक्षक (२०२३)**

नरेंद्र राठोड (अकोले), सोमनाथ घुले (संगमनेर), सचिन अढांगळे (कोपरगाव), भारती देशमुख (राहाता), सविता साळुंके (श्रीरामपूर), अनिल कल्हापुरे (राहुरी), सुनीता निकम (नेवासा), अंजली चव्हाण (शेवगाव), भागिनाथ बडे (पाथर्डी), एकनाथ चव्हाण (जामखेड), किरण मुळे (कर्जत), जावेद सय्यद (श्रीगोंदा), विजय गुंजाळ (पारनेर), साधना क्षीरसागर (नगर), रावजी केसकर (केंद्रप्रमुख, पारनेर), अशोक विटनोर (केंद्रप्रमुख, श्रीरामपूर).

### महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना जाहीर

नागरिकांना आता वेगळ्या प्रभागातून आपला प्रतिनिधी निवडावा लागणार आहे. या प्रारूपात काही महत्वाचे बदल करण्यात आले आहेत. यामध्ये गावडे मळा परिसर, जो आधी प्रभाग १ मध्ये होता, तो आता प्रभाग २ मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. नागापूर गावठाण परिसर, जो प्रभाग ६ मध्ये होता, तो आता प्रभाग १ मध्ये जोडला गेला आहे. गांधीनगर परिसर प्रभाग ८ मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. यामुळे काही प्रभागांची लोकसंख्या कमी-जास्त झाली असून स्थानिक राजकीय समीकरणांवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, २०१८ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीतही २०११ च्या जनगणनेच्या आधारावरच १७ प्रभाग निश्चित करण्यात आले होते. त्यावेळी एकूण ६८ नगरसेवकांची निवड झाली होती. या मंडळाचा कार्यकाळ डिसेंबर २०२४ मध्ये संपला. त्यानंतर तब्बल दोन वर्षांपासून महापालिकेत प्रशासक राज सुरू आहे. राज्य निवडणूक आयोगाने २३ जून २०२५ रोजी प्रभाग रचनेचे वेळापत्रक जाहीर केले होते. त्यानुसार प्रारूप प्रभाग रचना, नकाशे आणि लोकसंख्येचा तपशील महापालिका आयुक्त डांगे यांनी आता प्रसिध्द केला आहे.

प्रभागांचे नवे आराखडे जाहीर झाल्यामुळे नागरिकांना आता स्वतःच्या क्षेत्रातील बदलांची माहिती घेणे आवश्यक झाले आहे. कुठल्या प्रभागात आपण समाविष्ट आहोत, आपला मतदान केंद्र कोणत्या सीमारेषेत येणार आहे हे समजून घेणे महत्वाचे ठरणार आहे. शिवाय, पुढील निवडणुकांमध्ये स्थानिक नेत्यांना नव्या प्रभाग रचनेनुसार प्रचार धोरण आखावे लागणार आहे.

महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाल्यामुळे आगामी निवडणुकांची रंगत वाढली आहे. काही भागांचे प्रभागांमध्ये झालेले बदल हे स्थानिक राजकारणाला नवे वळण देऊ शकतात. नागरिकांनी आता १५ सप्टेंबरपर्यंत आपापल्या हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**प्रभाग रचनेचा कार्यक्रम**

३ ते १५ सप्टेंबर : प्रारूप रचनेवर हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत, १६ ते २२ सप्टेंबर : जिल्हाधिकाऱ्यांमार्फत नियुक्त अधिकारी हरकतींवर सुनावणी घेतील, २३ ते २५ सप्टेंबर : सुनावणीनंतरच्या शिफारशींसह अंतिम आराखडा नगरविकास विभागाकडे पाठवला जाईल, २६ ते ३० सप्टेंबर : नगरविकास विभाग राज्य निवडणूक आयोगाकडे अंतिम प्रस्ताव सादर करेल, ९ ते १३ ऑक्टोबर : राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर महापालिका आयुक्त अंतिम प्रभाग रचना जाहीर करतील

**प्रभागनिहाय लोकसंख्या**

प्रभाग १ (२२,२३४), प्रभाग २ (२२,०१५), प्रभाग ३ (१९,३८४), प्रभाग ४ (२२,४०५), प्रभाग ५ (१९,८९०), प्रभाग ६ (१९,२२१), प्रभाग ७ (१९,७७९), प्रभाग ८ (१९,८१२), प्रभाग ९ (२०,७५६), प्रभाग १० (२२,३४४), प्रभाग ११ (२०,७५६), प्रभाग १२ (१८,८०४), प्रभाग १३ (१८,८८२), प्रभाग १४ (१९,८९४), प्रभाग १५ (१८,५३७), प्रभाग १६ (२२,१६३), प्रभाग १७ (१९,७२९).